# 'विश्वकर्मा'कडून पाच गावे दत्तक

## शुद्ध पाण्याच्या पुरवठ्यासाठी प्रयत्न



गावकऱ्यांशी संवाद साधताना 'विश्वकर्मा'चे विद्यार्थी.

**पुणे :** उन्नत भारत अभियानयाअंतर्गत विश्वकर्मा विद्यापीठातर्फे पाच गावे दत्तक घेण्यात आली आहेत. विद्यापीठातर्फे या गावांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी पुरवण्यात येणार आहे. यामध्ये सिंहगड परिसरातील सामरेवाडी, थोपटेवाडी (१ आणि २), भादलवाडी आणि मोरदरी ही गावे आहेत.

तंत्रशिक्षणाच्या विद्यार्थ्यांनी खेड्यांतील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, या उद्देशाने उन्नत भारत अभियान सुरू करण्यात आले आहे. यासाठी देशभरातील काही शिक्षण संस्थांची निवड करण्यात आली असून, त्यात विश्वकर्मा विद्यापीठाचाही समावेश आहे. या अभियानाचा पहिला टप्पा म्हणून विद्यापीठाच्या इंजिनीअरिंग शाखेच्या ६७ विद्यार्थ्यांनी या गावांची पाहणी केली.

'विश्वकर्मा विद्यापीठाच्या 'विलो फाउंडेशन'शी असलेल्या कराराअंतर्गत विद्यापीठाच्या आवारात 'वॉटर क्वालिटी सेंटर ऑफ एक्सलन्स' आणि 'वॉटर एटीएम केंद्र' उभारण्यात आले आहे. विश्वकर्मा विद्यापीठातर्फे या गावांत अशीच वॉटर एटीएम केंद्रे सुरू करण्यात येतील,' असे प्रा. माया कुरूळेकर यांनी नमूद केले. प्रा. कैलास भोसले, प्रा. माया कुरूळेकर, प्रा. मृण्मयी रानडे, प्रा. संदीपकुमार शुक्ला, प्रा. जमील अहमद अन्सारी, प्रा. सोनाली बोतकर, प्रा. ऋशिका हेदेखील या उपक्रमात सहभागी होणार आहेत.